राज्य ई-गव्हर्नन्स पारितोषिक मुल्यांकन समिती
गठीत करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग**
**कार्यालयीन आदेश क्रमांकः GAD-मतस023/2/2013-DIR-DIT(MH)-DIT (MH)**
सातवा मजला, मंत्रालय, मादाम कामा रोड
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई - ४०००३२
तारीख: १७ जुन, २०१३

**वाचा :**

**१) शासन निर्णय क्रमांकः मातंस/नस्ती ०९/प्र.क्र.४३/३९ दि. ११ ऑगस्ट, २००९**

प्रतिवर्षी दि.२० ऑगस्ट रोजी माहिती तंत्रज्ञान दिन साजरा करण्याचा व सदर दिवशी ई-गव्हर्नन्स गुणवत्ता पारितोषिके वितरीत करण्याबाबत दि.११ ऑगस्ट, २००९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. त्यानुसार माहिती तंत्रज्ञानाचा प्रशासकीय कामकाजामध्ये प्रभावी व यशस्वीपणे जनहिताच्या दृष्टीने वापर करणाऱ्या शासनातील संस्थांना/घटकांना खालील ६ बाबींमध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल पारितोषिके देण्यासाठी निवड करावयाची आहे.

१) सर्वोत्कृष्ट ई-गव्हर्नन्स (E-Governance Excellence Awards)
२) ई-गर्व्हर्नन्सच्या सहाय्याने कार्यपद्धतीत उत्कृष्ट बदल (Excellence in Process Reengineering)
३) ई-गव्हर्नन्सद्वारे नागरीकेंद्रीत सुविधांचे उत्कृष्ट प्रदान (Excellence in Citizen Centric Service Delivery)
४) उत्कृष्ट वेबसाईट/पोर्टल (Best website / Portal)
५) माहिती तंत्रज्ञानाचा प्रशासनात अभिनव वापर (IT Innovator of The Year)
६) माहिती तंत्रज्ञानाचा पर्यावरणासाठी वापर (IT for Environment Award)

त्यासाठी सदर शासन निर्णयातील परिच्छेद ४ मध्ये नमूद केल्यानुसार उपरोक्त ६ क्षेत्रांमध्ये प्रत्येकी ३ प्रस्तावांची निवड करण्यासाठी खालीलप्रमाणे “राज्य ई-गव्हर्नन्स पारितोषिक मुल्यांकन समिती” गठीत करण्यात येत आहे.

| क्रमांक | समितीचे सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा.मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २ | सचिव (माहिती तंत्रज्ञान) | सदस्य सचिव |
| ३ | नॅसकामचा प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | सीएसआय / टीआयएफआर किंवा आयआयटी, मुंबई यांचा प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | डीडीजी - युआयडीएआय | सदस्य |

प्रस्तावित प्रकल्पांच्या तांत्रिक बाबीची पडताळणी करिता CDAC आणि NIC यांच्या प्रतिनिधीचे सहाय्य घेण्यात येईल.

समितीने घेतलेला निर्णय हा सर्वांसाठी अंतिम व बंधनकारक राहील. उपरोक्त आदेश तात्काळ अंमलात येईल.

सदर कार्यालयीन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०६१९१४३९१५९२११ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aggarwal Ra esh adanlal

Digitally signed by Aggarwal Ra esh adanlal
DN CN Aggarwal Ra esh adanlal, C IN, S aharashtra, Govt of aharashtra, Directorate of Information Technology
Reason I am a roving this doc ment
Date २०१३.०६.२० १७ ५३ १५ ०५ ३०

**राजेश अग्रवाल**
सचिव (मातं)

प्रत,

१) राज्यपाल यांचे सचिव
२) मुख्यमंत्री यांचे सचिव
३) उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
६) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
७) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ / अपील) शाखा, मुंबई
८) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
९) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१०) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद/विधानसभा), मुंबई
११) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
१२) मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
१३) निवड नस्ती (२ प्रती)